"विवरणपत्र अ"

दि. 25.08.2021

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

# जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधित पदभरतीबाबत जाहीर प्रकटन

---

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट-क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 रोजी शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतू तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परीक्षा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड-19 साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण 2020/प्र.क्र.99/आस्था-8 दि.20 ऑगस्ट 2021 अन्वये ग्रामविकास विभाग अंतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधीत **आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक** या 5 संवर्गातील जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 मध्ये नमूद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 मध्ये आरोग्य विभागाशी संबंधीत पदांकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.**

1. सदर जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधीत पदांकरिता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी **www.maharddzp.com** या संकेतस्थळावर जाऊन Login ID व Password create करणे आवश्यक आहे.
2. सदर जाहीरातीमध्ये आरोग्य विभागाशी संबंधीत उपरोक्त 05 संवर्गातील पदांकरिता दिव्यांगांकरिता निश्चित करणेत आलेल्या आरक्षणामध्ये महा. शासन, ग्राम विकास विभागकडील शासन निर्णय क्र.दिव्यांग-2019/प्र.क्र.141/आस्था-8 दि.22.02.2021 व ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण 2020/प्र.क्र.99/आस्था-8 दि.14 जून 2021 नुसार दिलेल्या सूचनेप्रमाणे खालीलप्रमाणे **दिव्यांगांसाठी सुधारीत आरक्षण** नमूद करणेत येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | मार्च 2019 च्या जाहिरातीनुसार भरावयाची रिक्त पदे | मार्च 2019 च्या जाहिरातीतील दिव्यांगांकरिता आरक्षीत पदसंख्या | दिव्यांगांकरिता सुधारित आरक्षणानुसार पदसंख्या | भरावयाच्या दिव्यांगांच्या रिक्त पदांचे समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 01. | आरोग्य पर्यवेक्षक | 01 | निरंक | 00 | **00** |
| 02. | औषध निर्माता | 06 | निरंक | 00 | **00** |
| 03. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 01 | निरंक | 00 | **00** |
| 04. | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | 21 | निरंक | **01** | **LV** (Low Vision) – **01 पद** |
| 05. | आरोग्य सेवक (महिला) | 41 | 08 | **02** | **LV** (Low Vision) – **01 पद**<br>**D, HH** (Deaf, Hard Of Hearing ) –**01 पद** |

**वरील प्रमाणे जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 मध्ये आरोग्य सेवक (महिला) करिता 08 पदे दर्शविणेत आलेली आहेत. तथापि, महा.शासन, साप्रवि कडील शासन निर्णय दि.29 मे 2019 अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दिव्यांगांसाठी रिक्त पदाच्या 4% आरक्षणानुसार 02 पदे सुधारीत करुन दर्शविणेत येत आहेत. यानुसार शासनाने ग्राम विकास विभागाच्या दि.22.06.2021 च्या शासन शुध्दीपत्रकात नमूद केलेल्या www.maharddzp.com या संकेतस्थळावर उमेदवाराने अर्ज नोंदविण्यात यावेत.**

**वरील पदांसाठीची वयोमर्यादा व शैक्षणिक पात्रता खालीलप्रमाणे असतील.**

| अ.क्र. | पदाचे नांव | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 |
| 01. | आरोग्य पर्यवेक्षक | किमान 18 वर्षे व कमाल 45 वर्षे | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी धारण केलेली असेल आणि ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा 12 महिन्याचा पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला असेल अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. |
| 02. | औषध निर्माता | | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदवीका धारण करणारे आणि औषध शास्त्र अधिनियम 1948 खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार. |

Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदाचे नांव | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 |
| 03. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | किमान 18 वर्षे व कमाल 45 वर्षे | ज्याने मुख्य विषय म्हणून भौतीकशास्त्र किंवा रसायनशास्त्र अथवा जीवशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र अथवा प्राणीशास्त्र किंवा सुक्ष्म जीवशास्त्र यासह विज्ञान विषयामध्ये पदवी धारण केली असेल अशा उमेदवारातून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(परंतु हाफकिन संस्थेच्या वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रा मध्ये पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना अधीक पसंती देण्यात येईल.) |
| 04. | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | | विज्ञान विषय घेवून माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण झालेले उमेदवार, राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून 90 दिवसांचा फवारणी कामाचा अनुभव आवश्यक.<br>ज्यांनी बहुउददेशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा 12 महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहिल. |
| 05. | आरोग्य सेवक (महिला) | | ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. |

वरील नमूद नव्याने समाविष्ठ झालेल्या दिव्यांगांच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापूर्वी जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 नुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल.

3. जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 मध्ये आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या 5 संवर्गाकरिता आवेदनपत्र / अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधीत प्रवर्गातून परीक्षेकरिता पात्र राहतील.
4. मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र. 15737/2019 व इतर याचिकांमध्ये शासकीय नोकऱ्यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द ठरविले आहे.

तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेमध्ये रुपांतरीत झाल्या आहेत. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणामध्ये वाढ होत आहे. सदर समांतर आरक्षणामध्ये वाढ किंवा घट करण्यास शासनाच्या ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण-2020/प्र.क्र.99/आस्था-8. दि.25.06.2021 च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. तसेच खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणात वाढ झालेल्या प्रवर्गाची पदसंख्या खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | मार्च 2019 च्य जाहिरातीतील एसईबीसी प्रवर्गाकरिता आरक्षीत पदे | मार्च 2019 च्या जाहिरातीतील खुल्या प्रवर्गाकरिता आरक्षीत पदे | खुल्या प्रवर्गाकरिता सुधारीत आरक्षणानुसार पदसंख्या | खुल्या प्रवर्गासाठी भरावयाच्या रिक्त पदांचे समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01. | औषध निर्माता | 01 | 01 | 02 | सर्वसाधारण – 01<br>महिला - 01 |
| 02. | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | 03 | 10 | 13 | माजी सैनिक - 02<br>अंशकालीन - 01<br>खेळाडू – 01<br>प्रकल्पग्रस्त - 01<br>सर्वसाधारण - 08 |
| 03. | आरोग्य सेवक (महिला) | 07 | 06 | 13 | माजी सैनिक - 02<br>महिला - 04<br>अंशकालीन - 01<br>खेळाडू – 01<br>प्रकल्पग्रस्त - 01<br>सर्वसाधारण - 04 |

सदर समांतर आरक्षणातील बदलामुळे वाढलेल्या प्रवर्गाच्या उमेदवाराने यापूर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गात अर्ज सादर केला असल्यास त्याने नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाचा विकल्प देण्यात यावा.

Scanned with CamScanner

सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ, दिनांक 23 डिसेंबर 2020 च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातून (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. याअनुषंगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गाबाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दि. 01 सप्टेंबर 2021 ते दि. 21 सप्टेंबर 2021 या कालावधीत** विकल्प द्यावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापि, ज्या एसईबीसी (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने ईडब्लूएस (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे, त्याने परीक्षेपूर्वी सक्षम अधिकाऱ्यांचे ईडब्लूएस (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे ईडब्लयूएस प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

5. जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. सदर उमेदवारांना खुल्या प्रवर्गात घेताना खुल्या प्रवर्गासाठी असलेली वयोमर्यादा तसेच परिक्षा शुल्क लागू राहील. खुल्या प्रवर्गासाठी विकल्प दिलेल्या तसेच खुल्या प्रवर्गात गणना होणाऱ्या एसईबीसी प्रवर्गातील जर संबंधित उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या वयोमार्यादितून पात्र ठरत असेल तर त्यास खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले परीक्षा शुल्क (यापूर्वी एसईबीसी प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कम परिक्षेपूर्वी अदा करणे आवश्यक राहील) सदर उमेदवारांनी दि.01 सप्टेंबर 2021 ते दि.21 सप्टेंबर 2021 कालावधीत वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावरून शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरून शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.
6. जाहिरात क्र.01/2019 दि.02.03.2019 नुसार ऑनलाईन परीक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी तसेच एका किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, शासनाने आता महापरीक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती व OMR Vendor मार्फत राबविणेत येणार असल्याने उपरोक्त 05 संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परीक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी राबविणेत येणार आहे. त्यामुळे उमेदवारांना एकाच जिल्हा परिषदेमध्ये परीक्षेकरीता उपस्थित राहता येईल. यासाठी उमेदवाराने परीक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर दि. 01 सप्टेंबर 2021 ते 21 सप्टेंबर 2021 या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल.
7. विकल्प नोंदविताना काही अडचणी उद्भवल्यास उमेदवारांनी **07292006305** भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.
8. अनुकंपा भरती, ग्रापं कर्मचाऱ्यांमधून 10 % नामनिर्देशाने करावयाची भरती अथवा इतर कोणत्याही प्रशासकीय कारणामूळे जाहिरातीत नमूद पदे कमी किंवा जास्त होऊ शकतात. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही दावा करता येणार नाही. याबाबत जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
9. वरीलप्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखून ठेवण्यात येत आहेत.

23/08/21

**(डॉ.महेश खलिपे)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग तथा,**
**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती**

**(श्याम चव्हाण)**
**जिल्हा समाजकल्याण अधिकारी,**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग तथा,**
**सदस्य, जिल्हा निवड समिती**

**(राजेंद्र पराडकर)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग तथा,**
**सदस्य, जिल्हा निवड समिती**

**(प्रजित नायर) भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग तथा,**
**सदस्य, जिल्हा निवड समिती**

**(के. मंजुलक्ष्मी) भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग तथा,**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**

**स्थळ –** सिंधुदुर्गनगरी
**दिनांक –** 25/08/2021

Scanned with CamScanner